# श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस.के.बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२८

दुरध्वनी : ०२२-२४२२४४३८ | फॅक्स: ०२२-२४२२१५५८

ईमेल : admin@siddhivinayak.org | www.siddhivinayak.org


दिनांक– २८/१२/२०२३

श्री सिध्दिविनायक

## व्दितिय मुदतवाढ

### दरपत्रके मागविण्यासंदर्भातील सूचना

विषय : वैद्यकिय विभाग व पुजारी विभागाकरीता नविन फर्निचर/हार्डवेअर साहीत्य खरेदी करण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्याबाबत...

वैद्यकिय विभाग व पुजारी विभागाकरीता नविन फर्निचर/हार्डवेअर साहीत्य खरेदीकरीता मोहोरबंद दरपत्रके खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहेत.

वरील कामाकरीता अटी, शर्तीबाबतची माहिती व दरपत्रके डाउनलेड करण्यासाठी न्यासाच्या www.siddhivinayak.org या संकेतस्थळावर भेट द्यावी.

**दरपत्रक प्रसिध्दिचा दिनांक** : मंगळवार, दि. १९ डिसेंबर २०२३

**दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक** : मंगळवार, दि. २ जानेवारी २०२४, सायं.५.०० वा. पर्यंत.

**दरपत्रके उघडण्याचा दिनांक** : बुधवार, दि. ३ जानेवारी २०२४, दुपारी. २.०० वा.

**अटी व शर्ती :**

१) वैद्यकिय विभाग व पुजारी विभागाकरीता नविन हार्डवेअर साहीत्य खरेदी करण्यासाठी दर मागविण्यात आले आहे.

२) सर्व साहित्य खरेदी विभागात पॅकिंग व फॉरवडींगसह पोच करावयाचा आहे. वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही.

३) मान्य दरानेच फर्निचर/हार्डवेअर साहीत्य पुरवठा करावा लागेल. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

४) सदर साहित्याचे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसात सदर साहित्याचा पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील

५) दरपत्रक भरतांना कर वगळून रक्कम भरावी.

६) नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करणेत येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदाकरणेची जबाबदारी दर पत्रकधारकाची राहील.

७) कोणतीही कारणे न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

८) दरपत्रकधारकाने मोहोरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे :

अ) कंपनी नोंदणी दाखला

ब) ट्रेडिंग लायसेन्स

क) आयकर नोंदणी पॅनकार्ड

ड) सेवाकरजी. एस.टी. नोंदणी दाखला

९) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवड प्रक्रीयेतुन बाद करण्यात येईल.

१०) उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्तीविहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. आपली कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी